गुरूवार दिनांक २६ नोव्हेंबर,२०२० रोजी दु.१२.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या नाशिक जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृत्त.

सभेस उपस्थित असलेल्या सभासदांची नोंद नोंदवहीत घेण्यात आली आहे.

सर्वप्रथम श्री.सतीश भामरे, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक तथा सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, नाशिक जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नाशिक यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरूवात केली.

महाराष्ट्रातून विविध वस्तूंची निर्यात वृद्धी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० रोजी जाहिर केलेल्या शासन निर्णयाची माहिती महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक यांनी सर्व उपस्थित सभासदांना करून दिली व जिल्हा स्तरावरील जिल्हा निर्यात प्रचालन समितीने कशा पद्धतीने कामकाज करावयाचे आहे त्याचीही माहिती सभेत दिली. त्यानंतर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार जिल्ह्यातून निर्यात वाढीच्या दृष्टीने काय उपाययोजना करता येतील याविषयी मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, नाशिक जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नाशिक यांनी सविस्तर माहिती उपस्थित सभासदांकडून जाणून घेतली. जिल्ह्यातील निर्यात वाढविण्याच्या दृष्टीने एक सर्वंकष कृती आराखडा तयार करणेबाबत मा.अध्यक्षांनी सूचना केली.

जिल्ह्यात देशातील निर्यात परिषदांशी साधारणतः १००० नोंदणीकृत उद्योग घटक / संस्था / व्यापारी असून मुंबई व परदेशातील व्यापा-यांशी सामंजस्य करार करण्याच्या शक्यता पडताळून पाहणे, जिल्ह्यातून कांदा, द्राक्षे, औद्योगिक वस्तू, भाजीपाला किती प्रमाणात निर्यात होतो, कोणकोणत्या वस्तू, भाजीपाला यांना निर्यातीस वाव आहे अशा घटकांची सविस्तर यादी वर्गवारीनुसार तयार करणे, त्यात जास्त प्रमाणाकडून कमी प्रमाणात निर्यात होणा-या घटकांची यादी तयार करणे, त्यातील महत्वाच्या व्यक्ती कोण आहेत ते शोधणे, अशा प्रकारच्या सूचना मा.अध्यक्षांनी सभेत केल्या.

जिल्ह्यात द्राक्ष उत्पादन साधारणतः २० लक्ष मे.टन होत असून निर्यात फक्त १.५ लक्ष मे.टन होत आहे व हे प्रमाण फारच कमी असल्याचे अध्यक्षांनी सांगितले.

जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समितीच्या माध्यमातून खालील ३ महत्वाच्या मुद्यांवर भर देण्यात यावा असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले.

१. निर्यात सद्यस्थिती
२. मोठ्या प्रमाणात निर्यात करणा-या घटकांपैकी तज्ञ घटक/व्यक्ती यांनी विशेष निमंत्रीत म्हणून पुढील सभेस आमंत्रित करणे.
३. परदेशात निर्यात संबंधी येणा-या अडीअडचणी राज्य व केंद्र शासनाच्या मदतीने सोडविणे.

Marketing मध्ये बदल करून आर्थिक उत्पन्न वाढविणे तसेच पुढील बैठक Video Conferencing द्वारे घेण्यात यावी असेही मा.अध्यक्षांनी सूचीत केले.

नाशिक जिल्ह्यातून U.K. Landon मध्ये चालू वर्षी ७.८४ लक्ष मे.टन भाजीपाला निर्यात झाल्याची माहिती HALCON LTD. ;चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेत दिली. तसेच कांद्याचे ८.५१ लक्ष मे.टन निर्यात झाल्याचे सांगितले.

जिल्ह्यातून आज होणारी निर्यात व त्यात वाढ होण्याच्या दृष्टीने नवीन ठिकाणांची निवड करणे, उद्दिष्ट ठरविणे व त्यादृष्टीने कृती आराखडा तयार करणे अशा प्रकारे समितीने कामकाज करावे असे अध्यक्षांनी सूचीत केले.

श्री.खापरे, द्राक्ष निर्यात संघटना यांनी निर्यात संबंधी येणा-या समस्या सभेत मांडल्या.

Apeda कडे Registration करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी पाहिजे आहे.
Technology Upgradation करीता निधीची तरतूद करण्यात यावी.
Pollution Control Board यांचे Certificate द्यावे लागते.
Dry Port ची आवश्यकता आहे, त्यातील अडचणी दूर करणे.
Reseach Analysis करीता आवश्यक Chemicals ला Approval मिळत नाही.
Europe मध्ये Duty ८% आहे पण दुस-या देशांत Duty Free आहे.
DGFT द्वारे मार्गदर्शक सूचना देणे.
Customer / Market Demand प्रमाणे Open Variety पाहिजे

HALCON Ltd. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे सूचना केली.

नाशिक जिल्ह्यातून ७०% द्राक्षे निर्यात होतात त्याचे Presentation, Exhibition, International Trade Fare नाशिक मध्ये लावणे, Road Map बनवणे.

AIMA चे उपाध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे सूचना मांडली.

Licensing, Clearances, road block दूर करणे. DGFT यांनी सर्व परवानग्या Online कराव्यात.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री व ॲग्रीकल्चर यांचे प्रतिनिधी यांनी सूचीत केले की,

ज्या इंडस्ट्रीज आयात पर्याय म्हणून उत्पादनात जातील त्यांना Support करण्याचा प्रस्ताव शासनास देणे

महाव्यवस्थापक, जिउकें, नाशिक यांनी सूचीत केले की,

आयातील पर्याय म्हणून आपल्याच देशात पर्यायी वस्तू निर्मिती करणे व त्यास प्रोत्साहन देणेबाबत विचारविमर्ष करावा. यासंबंधी राज्य शासनही आग्रही असल्याचे सांगितले.

वर नमूद केल्याप्रमाणे संबंधीत यंत्रणा यांनी त्यांचेकडे असलेल्या परवानग्या त्वरीत देण्याबाबत काय सुलभता आणता येईल या विषयीची योजना तयार करून ती जिल्हा समितीस सादर करावी व जिल्हा समिती मार्फत शासनस्तराव त्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल असे मा.अध्यक्षांनी सभेतसांगितले.

येणेप्रमाणे सभेचे कामकाज झाल्यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून सदस्य-सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नाशिक यांनी मा.अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

27/11/20

महाव्यवस्थापक,जिउकें
तथा सचिव,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नाशिक.

मा,जिल्हाधिकारी
तथा अध्यक्ष,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नाशिक.